**कृपया प्रसिद्धीसाठी** **26 मार्च 2009**

**भाजपा चे अध्यक्ष व आमदार श्री.गोपाळ शेट्टी यांनी उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना व मित्र पक्षांचे उमेदवार श्री. राम नाईक यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेबाबत घेतलेल्या पत्रकार परिषदेत गुरुवार, 26 मार्च 2009 रोजी प्रसिद्ध केलेले पत्रक**

**मुंबई, गुरुवार**ः "भाजपा-शिवसेना युती पुन्हा एकदा उत्तर मुंबईत इतिहास घडवेल आणि प्रचंड मताधिक्याने युतीचे उत्तर मुंबईतील उमेदवार श्री. राम नाईक यांचा विजय होईल", असा विश्वास भाजपा-मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केला. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील युतीचे उमेदवार व ज्येष्ठ नेते श्री. राम नाईक यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेची माहिती देण्यासाठी बोलविलेल्या पत्रकार परिषदेत श्री शेट्टी बोलत होते.

"1978 पासून बोरीवलीतून तीनदा विधानसभेवर व त्यानंतर सलग पाचदा लोकसभेवर निवडून आलेले श्री राम नाईक हेच मतदार संघाचा बुलंद आवाज सार्वभौम लोकसभेत पोचवू शकतात. लोकसेवा करणाराच लोकसभेत असला पाहिजे हे आता उत्तर मुंबईतील सुजाण मतदारांनी ओळखले आहे. या मतदारांना मतदानाचे आवाहन करण्यासाठी उद्या गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर आम्ही उत्तर मुंबईत घरोघर जाऊन प्रचार करण्यास प्रारंभ करीत आहोत", असे यावेळी श्री शेट्टी यांनी सांगितले.

प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात संपूर्ण मतदार संघ 'परिवर्तन रथ' व 'राम नाईक रथा'वरुन पिंजून काढण्यात येईल अशी माहितीही यावेळी श्री शेट्टी यांनी दिली. पत्रकारांच्या व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीतच श्री राम नाईक यांच्या निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणा-या 'परिवर्तन रथ' व 'राम नाईक रथ' या दोन्हीं वाहनांचे औपचारिक उद्घाटनही करण्यात आले. अतिशय प्रभावी वाटणा-या या दोन्हीं रथांवर भाजपाचे ज्येष्ठ नेते श्री अटल बिहारी वाजपेयी व श्री लालकृष्ण आडवाणी यांची तसेच शिवसेना प्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे व कार्याध्यक्ष श्री उद्धव ठाकरे यांची भव्य चित्रे आहेत. श्री राम नाईक यांचेही ठसठशीत छायाचित्र असलेले हे रथ 'जो लोकसेवेत तोच लोकसभेत' असे आवाहन करतात. कोणताही राजेशाही थाट न ठेवता ही वाहने

..2..

तंत्रज्ञानाच्या आघाडीवर अव्वल दर्जाची आहेत. "स्वतः श्री राम नाईक 'परिवर्तन रथावरुन' प्रचार करतील, तर मी आणि उत्तर मुंबईतील नगरसेवक व भाजपा-शिवसेनेचे स्थानिक नेते 'राम नाईक रथा'वरुन प्रचार करु", अशी माहिती यावेळी श्री. गोपाळ शेट्टी यांनी दिली. भाजपा, उत्तर मुंबईचे उपाध्यक्ष श्री राम जोरापूरकर यांचा वाहनांच्या बॉडी बिल्डिंगचा व्यवसाय आहे. श्री जोरापूरकर यांच्या 'त्रिकाया ऑटो ॲक्सिलरी प्रा.लि.' या कंपनीतच त्यामुळे हे दोन्ही रथ तयार करण्यात आले आहेत. 'परिवर्तन रथ' महिंद्राच्या 'बॉलेरो पिक अप्' गाडीवर तर 'राम नाईक रथ' टाटाच्या 'एस' गाडीवर उभारण्यात आले आहेत. रथात प्रामुख्याने ध्वनिक्षेपक व्यवस्था, प्रभावी प्रकाश व्यवस्था, नेते-कार्यकर्ते यांना उभे राहण्याची जागा, अभिवादनासाठी मतदारांना चढण्या उतरण्याची सुटसुटीत सोय यावर भर देण्यात आला आहे. "या दोन्ही रथांकडे मतदार तर आकृष्ट होतीलच पण कार्यकर्त्यांचाही कामाचा उत्साह वाढेल", असे मत यावेळी श्री शेट्टी यांनी व्यक्त केले.

रथावरुन मतदारांशी संपर्क साधत असताना मतदारांना मराठी, हिंदी, गुजराती व इंग्लिश अशा चार भाषांचे एकत्र छोटे पत्रक वाटण्यात येईल 'चला परिवर्तन घडवू या', 'जो लोकसेवेत, तोच लोकसभेत' पाठवा असे आवाहन या पत्रकांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्याशिवाय श्री राम नाईक हे 'उत्तर मुंबईचा बुलंद आवाज' आहेत असे ही पत्रकात सांगण्यात आले आहे.

सदर पत्रकार परिषदेला उमेदवार श्री राम नाईक तसेच त्यांचे निवडणूक प्रमुख व उत्तर मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष श्री योगेश सागर आणि शिवसेनेचे विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर हेही उपस्थित होते. "मतदार संघात माझी सातत्याने सुरु असलेली लोकसेवा, जनआंदोलने, सहज उपलब्धता यामुळे मतदारांनी पुन्हा एकदा भरघोस मताधिक्याने मला लोकसभेत पाठवावे" असे आवाहन यावेळी श्री. नाईक यांनी केले.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**